# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र

# दिनांक - 11/10/2019

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

---

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

प्रति,

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

प्रत - प्रमुख लिपीक- पत्रव्यवहार शाखा/आस्थापना शाखा/वाचक शाखा (पोअ यवतमाळ.)

# भाग १ - बदली /नेमणुक /पदोन्नती

11689

क्रमांक : पोअय/पशा-५/स.कामगार-तात्प.नेमणूक/२०१९ यवतमाळ. दि : 11 OCT 2019.

## : आदेश :

खालील अर्जदार यांची **शासन निर्णय गृह विभाग क्र.पीएए-०३१२/प्र.क्र.८६/पोल-५ अ दि.०७/०३/२०१८** मधील लागू असलेल्या नियमाचे अधिन राहून तसेच या कार्यालयाचे पत्र क्र.पशा-५/सुधारीत वेतन फरक/१५४८५ दिनांक ०५/१२/२०१८ अन्वये तात्पुरत्या स्वरुपात सफाई कामगार म्हणून मासीक मानधन तत्वावर प्रतीमाह रुपये २,५८०/- (अक्षरी रुपये दोन हजार पाचशे ऐंशी फक्त) प्रमाणे खालील अटीचे अधीन राहुन **दिनांक : ०१.०९.२०१९** पासून खालील दर्शविल्याप्रमाणे पोलीस स्टेशन/शाखा येथे नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पत्ता | कारण | नेमणुकीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | श्री.मो.रफीक शेख वजीर | नविन नेमणुक | उपविभागीय पोलीस अधिकारी,कार्यालय,यवतमाळ. |

टिप :-

१) आपणास नियमानुसार सकाळ/संध्याकाळ आवश्यकतेनुसार काम करण्यास हजर राहणे बंधनकारक राहिल.
२) सदर नेमणुक **तात्पुरती असल्याने** आपणास कायमपणाचे फायदयाकरिता हक्क देता येणार नाही.
३) आपणास नियमानुसार आदेशाविरुध्द न्यायालयात दाद मागता येणार नाही.
४) आपणास नियमीत कामावर न आल्यास व तसा आपणाविरुध्द अहवाल प्राप्त झाल्यास कोणत्याही प्रकारची सुचना न देता आपली सेवा समाप्त करण्यात येईल.
५) सदर नेमणुक मासीक माणधनावर असल्यामुळे (११) अकरा महिन्यानंतर १ (एक) दिवस सेवा खंड करुन पुन्हा नेमणुक करण्यात येईल.
६) दर महीण्याच्या २६ तारखेला या शाखेस हजेरी बाबतची माहीती सादर करणे माहीती अप्राप्त असल्यास मानधन आकारण्यात येणार नाही.तरी सर्व प्रकारची जवाबदारी प्रभारी यांची असेल.

(एम राज कुमार)
पोलीस अधीक्षक यवतमाळ

प्रति,
उपविभागीय पोलीस अधिकारी,यवतमाळ

प्रत : आकस्मीक खर्च लिपीक/डिपीजी लिपीक यांना पुढील कार्यवाहीस

## भाग २ - रजा

# निरंक

## भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

# निरंक

## भाग ४ - बक्षिस / मानधन

# निरंक

क्रमांक :पोअय/डीपी/३१-बी/अ.आ/तामील प्रत /सपोनि-उलेमाले / 11674 /२०१९ यवतमाळ, दि. 11 OCT 2019

**संदर्भ :-** १) महाराष्ट्र शासन गृह विभाग यांचे पत्र क्र.पीडीई १०१९/प्र.क्र.३८८/पोल-६ अ दि.०३/०९/२०१९

२) ला.लु.प्र.वि.नांदेड परी नांदेड यांचे पत्र क्र.आस्था-१/पो.नि./उलेमाले/शिक्षा अपील निर्णय /२०१९/३७८६ दि.०४/१०/२०१९

**विषय :-** **फेर अपील अर्ज निर्णय तामील करणेबाबत.**
**सपोनि/प्रमोद निवृत्ती उलेमाले नेमणुक पो.स्टे.आर्णी**

०००

संदर्भांकित विषयान्वये प्राप्त फेरअपील अर्ज निर्णयाच्या दोन (०२) प्रती आपणाकडे पाठविण्यात येत आहे. आपण एक (०१) प्रत सपोनि/प्रमोद निवृत्ती उलेमाले नेमणुक पो.स्टे.आर्णी यांना देवुन दुय्यम प्रतिवर त्यांची दिनांकीत स्वाक्षरी घेवुन ती दुय्यम प्रत या कार्यालयास सादर करण्यात यावी.

(अनिलसिंह गौतम)
प्र. पोलीस उपअधिक्षक,(मुख्या)
पोलीस अधिक्षक कार्या. यवतमाळ

**प्रति,**

सपोनि/प्रमोद निवृत्ती उलेमाले नेमणुक पो.स्टे.आर्णी

**मार्फतः-** उपविभागीय पोलीस अधिकारी,दारव्हा

प्रत :- आस्थापना लिपीक अधिकारी /वेतन लिपीक -२/ डिपीजी लिपीक यांना माहिती व योग्य

## मा. राज्यमंत्री, गृह (ग्रामीण), महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर

**क्रमांक :- पीडीई १०१९/प्र.क्र.३८८/पोल-६अ**

श्री. प्रमोद निवृत्ती उलेमाले, पोलीस निरीक्षक (एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाक, नांदेड ....वादी

**विरुध्द**

अपर पोलीस महासंचालक(प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई ...... प्रतिवादी

**मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपीले) नियम, १९५६ मधील तरतूदी अन्वये दाखल केलेल्या अपील अर्जावर सुनावणी**

वादी श्री. प्रमोद निवृत्ती उलेमाले, पोलीस निरीक्षक(एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाक, नांदेड हे राज्य गुप्तवार्ता विभाग, अकोला केंद्र येथे कार्यरत असतांना केलेल्या कसुरीमुळे शिस्तभंग प्राधिकारी तथा अपर पोलीस महासंचालक (प्रशासन), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी दिनांक १८/०३/२०१९ च्या आदेशान्वये **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षे कालावधीसाठी (अपरिणामकारक)"** ही शिक्षा दिली. सदर शिक्षेविरुध्द वादींनी शासनाकडे केलेल्या अपील अर्जावर दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९ रोजी माझ्यासमोर सुनावणी झाली. सदर सुनावणीस वादी हे स्वत: तसेच गृह विभाग, मंत्रालय येथील व क्षेत्रीय कार्यालयातील संबंधित अधिकारी उपस्थित होते.

**वादी यांच्यावरील थोडक्यात दोषारोप** :- "तुम्ही सपोनि प्रमोद निवृत्ती उलेमाले राज्य गुप्तवार्ता विभाग, अकोला केंद्र येथे कार्यरत असताना तुम्हा दि.१२/०८/२०१२ ते १८/०७/२०१४ दरम्यान फक्त एक वेळा अडाण धरण येथे भेट दिलली असून त्यानंतर एकही मर्मस्थळांना भेट दिलेली नसल्याचे दिसून आले व भट दिल्याचा अहवाल सादर केला नाही.

2. सहायक आयुक्त, वाशिम केंद्र यांनी तुम्हाला दि.१९/०१/२०१५ च्या पत्रान्वये जनसंपर्क वाढवून से तयार करुन वरिष्ठांना कामाचा वृत्तांत द्यावा, असे लेखी दिले परंतु तीन वर्षांच्या कालावधीत नाही केवळ एक बातमीदार असल्याबाबत सोसे रजिष्टरला नाद घेतली. दि.२९/१२/२०१४ ते दि.२७/१२/२०१४ पर्यंतच्या आठवडा डायरीमध्ये तुम्ही दि.२६/१२/२०१४ रोजीच्या अनसिंग येथील महिलांचे चूल पेटो आंदोलनाबाबत वरिष्ठांना माहिति सादर केली असे नमूद केलेले आहे परंतू तुम्ही आठवड़ा डायरी मध्ये सदर चाव असत्य लिहिल्याचे दिसून आले व त्यादिवशी नाही तेथे गेलेच नाही. त्यादिवशी स्वतः सहायक आयुक्त, वाशिम यासह नापोका/६६०, रमेश जाधव व नापाकॉ/१९०५ गजानन गिरी हे दोघ जिल्हाधिकारी कार्यालय येथे गले व माहिती घेवून त्यांनी स्वत : अहवाल पाठविल्याचे सिद्ध झाले आहे.

३. दि.२५/१२/२०१४ रोजीच्या आठवडा डायरीमध्ये तुम्ही बहुजन आघाडी कारंजा तालुक्याच वतीन जिल्हा अधिकारी कार्यालय, वाशिम येध आयोजित मोच्र्याबाबत माहिती संकलित करुन वरिष्ठांना माहिती पाठवल्याचे लिहले आहे. परंतु तुम्ही ती माहिती आठवडा यीमध्ये असत्य लिहिल्याच निष्पन्न झालेले आहे. सदरची माहिती श्री. आर. डी. अंभोरे, गुप्तवात अधिकारी यांनी वरिष्ठांना पाठविल्याचे निष्पन्न झालेले आहे, दि.१५/०२/२०१५ रोजी श्री. आनंदा धवनराव नायडे यांचे कृषी उत्पन्न बाजार समिती, रिसोड समोरील आमरण उपोषण समाप्त झाल्याबाबत तुम्ही आठवडा हायरीमध्ये असत्य लिहिल्याचे दिसून आले. कारण सदरची माहिती श्री. आर. डी. अंभोरे, गुप्तवार्ता अधिकारी यांनी वरिष्ठांना पाठविल्याचे निष्पन्न झाले आहे, सहायक आयुक्त वाशिम कद्र यानी तुमचे दि. १०/०३/२०१५ रोजी सदरचायत लेखी स्पष्टीकरण मागीतले असता, तम्ही स्थळप्रतीवर पाच न देता ती जवळ ठेवली व स्पष्टीकरण सादर केले नाही.

4. तुम्ही दुसन्या अधिका-याने केलेले कर्तव्य स्वत: केले असे खोटे भासन आठवडा डायरीमध्ये बनावट नोंदी

5. दि. ०१/०३/२०१५ ते दि. ०९/०३/२०१५ या कालावधीतील हजेरीपटावर आम्ही स्वाक्षरी न केल्याने सहायक आयुक्त, वाशिम कद्र यांनी तुमच्या नावासमोर ध मारुन टीकरण विचारले असता, तुम्ही सहायक आयुक्त, वाशिम यांनी केलेल्या रेषेवर स्वाक्षरी केल्याचे दिसून आले."

**वादी यांचे म्हणणे:-** महोदय, आमच्यावर ठेवण्यात आलेल्या दोषारोपाबाबत मी आपणास विनम्रपुर्वक येथे नमुद करु इच्छितो की, दि.१२/०८/२०१२ ते १८/०७/२०१४ या कालावधीत अडाण धरण व इतर मर्मस्थळांना भेटी दिलेल्या आहेत. व तसे तेथील रजिस्टरवर नोंदी देखील केलेल्या आहेत. याबाबत वरिष्ठांना वेळोवेळी माहिती दिलेली आहे. आम्हास काही विशिष्ट लक्ष दिलेले नव्हते, त्यामुळे वरिष्ठांना नेमके काय अपेक्षित आहे हे स्पष्ट होत नाही. तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त, वाशिम यांनी दि. १९/०१/२०१५ च्या पत्रान्वये जनसंपर्क वाढवून सोर्स तयार करुन कामाचा वृत्तांत सादर करणेबाबत कळविले असता, त्याबाबत आम्ही वेळोवेळी माहिती दिली आहे. काहीवेळा एकाच घटनेबाबतची माहिती दोन अधिकाऱ्यांनी स्वतंत्रपणे सादर केल्यास त्याबाबत गैरसमज होऊ शकतो. त्यामुळे आमच्यावर ठेवण्यात आलेली कसुरी चुकीच्या पध्दतीने ठेवण्यात आली असल्याचे दिसून येत आहे. महोदय, माझ्या १४ वर्षाच्या सेवाकाळापैकी मी ५ वर्षे नक्षलग्रस्त अतिदुर्गम भागात कर्तव्य बजावले आहे. मला उत्कृष्ट कामगीरीबद्दल ११ बक्षीसे प्राप्त झाली आहेत. मी आगामी काळात पोलीस निरीक्षक या पदाच्या नियमित पदोन्नती झोनमध्ये आहे. परंतु या शिक्षेमुळे पदोन्नतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. तरी महोदयांनी माझ्या या म्हणण्याचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला देण्यात आलेली शिक्षा रद्द करुन न्याय द्यावा, ही विनंती.

**प्रतिवादी यांचे म्हणणे** :- अपिलार्थी यांना देण्यात आलेली शिक्षा कसुरीच्या प्रमाणात योग्य असल्याने अपिलार्थी यांचा अपिल अर्ज फेटाळण्यात यावा.

**निष्कर्ष** :- वादी श्री. प्रमोद निवृत्ती उलेमाले, पोलीस निरीक्षक(एटप), तसेच उपस्थित अधिकारी यांचे म्हणणे ऐकले. तसेच उपलब्ध असलेली कागदपत्रे तपासण्यात आली. वादी यांनी त्यांच्या प्रतिपादनात नमुद केलेले मुद्दे लक्षात घेता तसेच वादी यांनी नक्षलग्रस्त भागात केलेली ०५ वर्षे इतकी सेवा व चांगल्या सेवेबद्दल त्यांना मिळालेली बक्षिसे विचारात घेता त्यांना देण्यात आलेल्या शिक्षेमध्ये बदल करणे उचित होईल या निष्कर्षास मी आलेलो आहे. त्यास अनुसरुन सदर अपील अर्ज प्रकरणी मी खालीलप्रमाणे निर्णय देत आहे.

**निर्णय**

१. वादी श्री. प्रमोद निवृत्ती उलेमाले, पोलीस निरीक्षक(एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाक, नांदेड यांचा अपील अर्ज मान्य करण्यात येत आहे.

२. वादी श्री. प्रमोद निवृत्ती उलेमाले, पोलीस निरीक्षक(एटप), लाचलुचपत प्रतिबंधक विभाक, नांदेड यांना देण्यात आलेली **"पुढील देय वार्षिक वेतनवाढ एक (०१) वर्षे कालावधीसाठी (अपरिणामकारक)"** ही शिक्षा रद्द करुन त्याऐवजी त्यांना **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देण्यात येत आहे.

३. वरील निर्णयाप्रमाणे संबंधितानी आवश्यक ती कार्यवाही करावी.

दिनांक :- २९/०५/२०१५

ठिकाण :- मुंबई. **सत्य प्रत**

महाराष्ट्र शासन

**(दिपक केसरकर)**

**राज्यमंत्री, गृह (ग्रामीण)**

11655

क्रमांक : पलि-७/मो.सा अग्रीम-(२०१९-२०)/ /२०१९ यवतमाळ. दिनांक : 1 1 OCT 2019

मा.पोलीस महासंचालक, म.रा.मुंबई यांचे आदेश क्रमांक : पोमसं/३१/३९-३/मोसाअ/२०१९-२०/४४/२०१९ दिनांक :०८/०८/२०१९ अन्वये यवतमाळ घटकातील नेमणूकीस मोटार सायकल अग्रीम प्रतिक्षासूचीत असलेल्या पोलीस अधिकारी/कर्मचारी/मंत्रालयीन कर्मचारी यांना वाटप करणेकरीता **रू.३५,००,०००/- (पस्तीस लाख)** प्रत्इतका निधी मंजूर करण्यात आलेला आहे,सदर निधीपैकी रू.१४०००००/- चौदा लाख इतका निधी यापूर्वी या कार्यालयाचे आदेश क्र.पलि-७/मो.सा अग्रीम २०१९-२०/१०२६९/२०१९ दि.२९.०८.२०१९ व रू.१७५००००/- सतरा लाख पन्नास हजार इतका निधी या कार्यालयाचे आदेश क्र.पलि-७/मो.सा अग्रीम २०१९-२०/१०४९८/२०१९ दि.०५.०९.२०१९ वाटप करण्यात आला आहे

## आदेश

मी श्री. एम.राज कुमार, पोलीस अधीक्षक यवतमाळ, मला शासन निर्णय वित्त विभाग, क्रमांक : २०१३/ प्र.क्र. ३०/ २०१३/विनियम, भाग-२, दिनांक : १७.४.२०१५ अन्वये मुंबई वित्तीय नियम १९५९ व वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ भाग पहिला, उप विभाग एक, अनुक्रमांक १२ नियम १३६, १३७ व १३९ नुसार प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय शक्तीचा वापर करुन प्रदान करण्यात आलेल्या नियमांच्या अधिन राहुन खालील नमुद ०४ पोलीस कर्मचारी/मंत्रालयीन कर्मचारी यांना प्राप्त निधीपैकी प्रत्येकी **रू.७००००/- सत्तर हजार फक्त यांप्रमाणे रू.२८००००/- (एकूण दोन लाख अंशी हजार) इतकी रक्कम** मोटार सायकल/स्कुटर/मोपेड खरेदी करण्यासाठी अग्रीम मंजुर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे नाव, पदनाम व बक्कल नंबर | नेमणुक पो.स्टे./ शाखा/ | मोटार सायकल/ मोपेड/ स्कुटर | एकूण मंजूर अग्रिमाची रक्कम | वसुल करावं याच्या हप्त्याची संख्या व मुददल | व्याजाकरीता राखीव हफते |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | पोना/१८२३ अमोल माधव चौधरी | पोस्टे कळंब | मोटार-सायकल | ७००००/- | २०००X३५ | ०७ |
| २. | पोशि/९३० वसीम कयुम शेख | पोस्टे दारव्हा | मोटार-सायकल | ७००००/- | २०००X३५ | ०७ |
| ३. | पोहवा/१४३२ विजय दुरशेटटीवार | जिल्हा वाहतूक शाखा | मोटार-सायकल | ७००००/- | २०००X३५ | ०७ |
| ४. | पोहवा/१८६३ दिलीप भगत | जिल्हा वाहतूक शाखा | मोटार-सायकल | ७००००/- | २०००X३५ | ०७ |
| | एकूण | | | २८००००/- | | |

**(अक्षरी रुपये दोन लाख एंशी हजार फक्त)**

२/ महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अग्रीम-२०१३/प्र.क्र.१०/२०१३/विनियम, तारीख : २० ऑगस्ट.,२०१४ तसेच मुंबई वित्तिय नियम-१९५९ मधील नियम १२४ (बी) व वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अग्रीम-१०९५/प्र.क्र.७०/९५/विनियम, दि.२६.९.९७ मध्ये नमुद तसेच **शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या अटी शर्ती सुधारीत वेतन मर्यादेनुसार लागु राहील. अटी शर्ती खालील प्रमाणे आहे.**

१) मासीक वेतन रु.८५६०/- (ग्रेड वेतन वगळुन) कमी नसावे.

२) वेतन बँड मधील मासीक वेतनाच्या ९ पट एवढी रक्कम किंवा रु.७००००/- किंवा मोटार सायकलची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रीम अनुज्ञेय राहील.

३) मोटार सायकल अर्गीमाची वसुली सेवानिवृत्तीच्या दिनांकानूसार हफ्त्याची आकारणी करण्यात येईल,किंवा व्याजासह ६० समान मासीक हप्त्यामध्ये करण्यात येईल. सुरुवातीचे ५० हप्ते प्रतिमाह रु. १४००/- याप्रमाणे व त्यानंतरचे १० हप्ते निर्धारीत व्याजदर (प्रथम अग्रीम व त्यानंतर व्याज) मध्ये करण्यात येईल.

४) वेतन बँड मधील मासीक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा स्कूटरची प्रत्यक्ष किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रीम अनुज्ञेय राहील.

५) वेतन बँड मधील मासीक वेतनाच्या ८ पट एवढी रक्कम किंवा रु.२५०००/- किंवा **मोपेडची प्रत्यक्ष** किंमत यापैकी जी रक्कम कमी असेल तेवढा अग्रीम अनुज्ञेय राहील.

६) मोटार सायकल/स्कुटर/मोपेड वाहन चालविण्यासाठी सक्षम प्राधिकाऱ्यांकडून कुंटुंबातील एका व्यक्तीला मिळालेल्या अनुज्ञप्तीची (Licence) छायांकीत प्रत सादर करावी लागेल.

७) वाहनाच्या मॉडेलचे नाव, उत्पादनाचे वर्ष, खरेदीची तारीख व त्यासंबधीची नोंदणी कागदपत्रे सादर करणे बंधनकारक राहील.

८) मोटार सायकल/स्कुटर/मोपेड विथ अॅडीशन व विमा शासकीय विमा निधीकडे उतरविण्यात यावा व तो सतत चालू राहिल याची दक्षता घेणे आवश्यक राहील तसेच विम्याची प्रत सादर करणे बंधनकारक राहील.

९) मोटार सायकल/स्कुटर/मोपेड साठी एकदा अग्रीम दिल्यानंतर पुन्हा अग्रीम अनुज्ञेय राहणार नाही. तसेच आदेश निर्गमीत होण्यापूर्वी, शासकीय अग्रीम घेवून खरेदी केलेल्या जुन्या वाहनाऐवजी पुन्हा नवीन वाहन खरेदीसाठी अग्रीम अनुज्ञेय असणार नाही.

१०) दिनांक : १ मे., २००१ रोजी किंवा त्यानंतर दोनपेक्षा अधिक अपत्ये असणाऱ्या अर्जदारास (दुसऱ्या वेळेस जुळया अपत्याचा अपवाद वगळता) या अग्रीमाचा लाभ घेता येणार नाही.

११) सदर अग्रीम मंजूरीच्या दिनांकापासून १ (एक) महिन्याचे आत अग्रीम धारकाने वाहन खरेदी करुन त्यासंबधीचे कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहिल. तसे न केल्यास अग्रीम धारकाकडून अग्रीमाची संपूर्ण रक्कम १ (एक) महिन्यानंतर दंडनिय व्याजासह एकरकमी वसुल करण्यात येईल. तसेच शासनाने वेळोवेळी निर्गमीत केलेल्या आदेशानुसार लागु ठरणारे दंडनिय व्याज लागु राहील.

१२) अग्रीमाची रक्कम वितरीत केल्यानंतर पुढील महिन्यापासून अग्रीमाची वसुली करण्यात येईल.

१३) वाहन अग्रीम रकमेच्या नियमीत वसुलीसाठी तसेच मंजूर अग्रीम रकमेपेक्षा जादा वसुली होत असल्यास त्यास अर्जदार स्वत: जबाबदार राहिल.

१४) अग्रीम धारक अनधिकृत गैरहजर राहिल्यास अथवा ईतर अन्य कोणत्याही कारणास्तव त्याच्या कर्तव्यापासून दूर राहिला तरीही वाहन अग्रीम तसेच शासनाकडील ईतर अन्य अग्रिमाची नियमीत परतफेड करण्यास अग्रिमधारक स्वत: जबाबदार राहिल.

१५) वित्त विभागाने आदेशाद्वारे वेळोवेळी विहित केल्यानुसार व्याजाचे दर राहतील.

१६) जुनी मोटार सायकल/स्कुटर/मोपेड खरेदी करीता अग्रीम अनुज्ञेय नाही.

१७) अग्रीम धारकाने मोटार-सायकल/स्कुटर/मोपेड घेण्यासाठी अग्रीम घेतला आहे त्याकरिता त्याचा विनियोग केला नाही. अग्रीम मिळविण्यासाठी गैरमार्गाचा अवलंब केल्यास तसेच अग्रिम व व्याज परतफेडीच्या संदर्भात ज्या काही अटी व शर्ती घालून देण्यात आलेल्या आहे त्याचे पालन करण्यात आले नाही यास्तव अग्रीमासाठी जो प्रचलीत व्याजदर आहे त्यापेक्षा रुपये २.७५ प्रतीशत जास्त दराने दंडनिय व्याज दर आकारण्यात येईल.

१८) अग्रीम व व्याजाची वसुली होवू शकली नाही तर कसुरदाराच्या मालमत्तेतून, महसुली थकबाकी वसुल करण्यासाठी जी कार्यपध्दती अवलंबवीली जाते त्यानुसार अग्रीम व त्यावरील दंडनिय व्याजाची वसुली करणे किंवा यासंदर्भातील विहित कायदयानुसार वसुली करण्यात येईल.

१९) अग्रीमाची अथवा दंडनिय व्याजाची वसुली होवू शकली नाही तर अग्रिमासाठी जामीन राहिलेले जेवढे जामीनदार असतील त्यांच्या वेतनातून समप्रमाणात व अग्रिम मंजूरीच्या आदेशात ठरवून दिलेल्या हप्त्याच्या रकमेईतकी रक्कम दरमहा याप्रमाणे एकूण अग्रीम व दंडनिय व्याजाची वसुली करण्यात येईल.

२०) खोटे प्रतिज्ञापत्र, खोटी सही, खोटा करारनामा ईत्यादी सादर करुन शासनाची फसवणुक झाल्याचे आढळून आल्यास मुंबई वित्तीय नियम १९५९ परिशिष्ट २६ मधील नियम ११ नुसार विभागीय चौकशी करण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

२१) अग्रीम मिळाल्यानंतर १ महिन्याच्या आत मोटार-सायकल/स्कुटर/मोपेड खरेदी केला नाही तर किंवा अग्रिमाचा गैरवापर केल्यास संपूर्ण अग्रीम १७.७५% व्याज दराने एकरकमी वसुल करण्यात येईल.

२२)अग्रिमाची रक्कम अदा करण्यापूर्वी वित्तीय नियम नमुना क्रमांक २० (Financial Rules From No. २०) मधील करारपत्र देणे बंधनकारक राहिल.

२३)अग्रिमाची रक्कम प्रदान झाल्यानंतर मोटार-सायकल/स्कुटर/मोपेड खरेदी केल्यानंतर वित्तीय नियम नमुना क्रमांक २१ (Financial Rules From No. २१) मधील मधील नमुन्यात गहाणखत तात्काळ सादर करणे बंधनकारक राहिल.

२४)अग्रीमाची रक्कम व त्यावरील व्याज सेवानिवृत्तीच्या वेळेस शिल्लक राहिल्यास किंवा एखादया आकस्मीक प्रसंग ओढावल्यास वरील अग्रिमाची कपात देय असणाऱ्या मृत्यू नि-सेवानिवृत्ती उपदानातून पूर्णपणे एकरकमी वसुल करण्यात येईल.

वरील अग्रीमाचा खर्च सन २०१९-२० या वित्तीय वर्षातील गृह विभाग मागणी क्रं.बी-११, मुख्य लेखाशिर्ष " ७६१० शासकीय कर्मचारी ई.कर्जे " मधील गौणशिर्ष २०२- मोटार वाहन अग्रिम (सांकेतांक क्रमांक ७६१०००९६) अन्वये खर्ची टाकण्यास व वित्तीय वर्ष २०१९-२० च्या मंजूर अनुदानातून भागविण्यास मंजूरी देत आहे.

(एम.राज कुमार)
पोलीस अधीक्षक, यवतमाळ

प्रति,

वेतन लिपीक - १ / रोखपाल लेखा शाखा, पो.अ.कार्यालय, यवतमाळ

२/- (१) आदेशातील नमुद अधिकारी/कर्मचारी यांना मंजूर करण्यात आलेले मोटार वाहन अग्रिम तात्काळ अदा करावे तसेच अग्रिम अदा केल्यानंतर त्याची दिनांकीत अदा रोल पावती, देयकाचा कोषागार प्रमाणक क्रमांक व दिनांक शासनास,महालेखापाल-१, मुंबई/महालेखापाल-२, नागपूर,/अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई/पोलीस महासंचालक,म.रा.मुंबई/विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र अमरावती यांना तात्काळ अहवाल सादर करुन त्याची प्रत पत्रव्यवहार शाखा - ७ यांना दयावी.

(२) अग्रीम धारकास मोटार सायकल अग्रीम अदा केल्यानंतर लगतच्या पुढील महिन्यापासून तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे सुरुवातीची मुददलाची रक्कम वसुल करावे व त्यानंतर उर्वरीत हप्त्याची निर्धारीत व्याजदराने वसुली करावी.

प्रत - वरील संबधीत कर्मचारी मार्फत पोस्टे प्रभारी अधिकारी

प्रत -प्रमुख लिपीक,आस्थापना शाखा/लेखा शखा/विभागीय चौकशी लिपीक/डिपीजी लिपीक/आस्थापना लिपीक /आकस्मीक लिपीक हयांना माहितीस

प्रत :- सहायक आस्थापना लिपीक-०१,०२,०३,०४,०५ यांना सेवापटात नोंदी करीता

# समाप्त